# महाराष्ट्र शासन
# वनविभाग
# मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) नाशिक

----------------------------

वनविभागातील नाशिक वनवृत्तातील **वनरक्षक** पदासाठी अर्जाच्या दिनांकास पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन **(online)** पध्दतीने विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या सुचना महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अखत्यारीतील महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादीत (एमकेसीएल) या संस्थेच्या forest.erecruitment.co.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. विहित केलेले नमुना अर्ज संकेत स्थळावर उपलब्ध आहे. अर्ज भरण्यापूर्वी उमेदवाराने संपूर्ण जाहिरात व अनुषंगिक सुचना काळजीपूर्वक वाचावी.

उपरोक्त संवर्गातील रिक्त पदसंख्या, त्या पदाकरिता विहित केलेली वेतनश्रेणी /शैक्षणिक अर्हता/अनुभव/शारीरिक पात्रता/वयोमर्यादा इत्यादिचा तपशिल खालील प्रमाणे आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज दिनांक १०/०९/२०१४ सायंकाळी ६.०० वाजेपर्यत स्विकारले जातील.

**पदांचा तपशील :-** **वर्ष २०१४ मधील भरती करिता :**

| विभाग / कार्यालयाचे नांव | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | विमाप्र | इमाव | शै/सा .इमाप्र | विशेष विमाप्र अ | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| **नाशिक** | ५ | २ | २ | १ | ० | ० | ४ | ० | १४ | ५ | ६४ | ९७ |

वरील उल्लेखित पदांकरिता आरक्षणापैकी पदनिहाय समांतर आरक्षण खालील प्रमाणे आहे.

| विशेष/समांतर आरक्षण | सर्व साधारण | महिला ३०% | माजी सैनिक १५% | अति उच्च, गुणवत्ताधारक खेळाडू ५% | होमगाड ५% | प्रकल्पग्रस्त ५% | भूकंपग्रस्त २% | पदवीधर/पदवीधारक अंशकालीन उमेदवार १०% | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.जाती | २ | १ | १ | ० | ० | ० | ० | १ | ५ |
| अ.जमाती | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ |
| विजा-अ | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ |
| भज-ब | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| भज-क | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| भज-ड | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| विमाप्र | २ | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ४ |
| इमाव | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| शैक्षणिक आणि सामाजिक दृ.मागास प्रवर्ग | ४ | ४ | २ | १ | १ | १ | ० | १ | १४ |
| विशेष मागास प्रवर्ग-अ | २ | १ | १ | ० | ० | ० | ० | १ | ५ |
| खुला | १९ | १९ | १० | ३ | ३ | ३ | १ | ६ | ६४ |
| एकूण | ३२ | २८ | १५ | ४ | ४ | ४ | १ | ९ | ९७ |

## वर्ष २०१५ मधील भरती करिता :

| विभाग / कार्यालयाचे नांव | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | विमाप्र | इमाव | शै/सा .इमाप्र | विशेष विमाप्र अ | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| **नाशिक** | १ | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | ० | ० | ३ | ६ |

वरील उल्लेखित पदांकरिता आरक्षणापैकी पदनिहाय समांतर आरक्षण खालील प्रमाणे आहे.

| विशेष/समांतर आरक्षण | सर्व साधारण | महिला ३०% | माजी सैनिक १५% | अति उच्च, गुणवत्ताधारक खेळाडू ५% | होमगाड ५% | प्रकल्पग्रस्त ५% | भूकंपग्रस्त २% | पदवीधर/पदवीधारक अंशकालीन उमेदवार १०% | **एकुण** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.जाती | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| अ.जमाती | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| विजा-अ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| भज-ब | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| भज-क | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| भज-ड | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| विमाप्र | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| इमाव | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| शैक्षणिक आणि सामाजिक दृ.मागास प्रवर्ग | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| विशेष मागास प्रवर्ग-अ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| खुला | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| **एकूण** | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |

**विशेष टिप - (१)** कंसात दर्शविलेली पदे अनुशेषाची आहेत. जाहिरातीत नमूद केलेल्या पदसंख्या दिनांक.३१ डिसेंबर २०१५ पर्यंत रिक्त होणा-या पदावर आधारीत असल्याने सदर नियुक्ती या रिक्त पदाच्या उपलब्धतेवर अवलंबून राहील. तसेच जाहिरातीत उल्लेख केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**(२)** शासन निर्णय दिनांक.१५/०७/२०१४ अन्वये राज्यात शैक्षणिक व सामाजिक दृष्टया मागास प्रवर्ग तथा शासन निर्णय दिनांक.१९/०७/२०१४ अन्वये विशेष मागास प्रवर्ग - अ या प्रवर्गासाठी शासनाने अनुक्रमे १६ टक्के व ५ टक्के आरक्षण लागू केलेले आहे. त्यामुळे बिंदू नामावलीमध्ये बदल झाल्यास वरील पद संख्येत व आरक्षणात बदल होऊ शकतो.

**१. वेतनश्रेणी/वेतन संरचना :-** रु.५२००-रु.२०२००, ग्रेड पे - रु.१८००

**२. शैक्षणिक पात्रता :-** उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इयत्ता १२ वी) गणित विषयासह किंवा विज्ञान व गणित या विषयासह उत्तीर्ण केली आहे.

**शासन अधिसुचना एफएसटी-१२/१३/प्र.क्र.६५१/फ-४ दिनांक ४.६.२०१४ व शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्र.एसएससी-२००५/(१४९/०५)/उमाशि-२, दि.२०/६/२००५ अन्वये इ. १२वी च्या परिक्षेशी समकक्ष परिक्षांची यादी प्रसिध्द करण्यात आलेली असून, सदर शासन निर्णय शालेय शिक्षण व**

**क्रिडा विभागाचे पत्र क्र.एसएससी-२०१०/(६६/१०)/ उमाशि-२, दि.२९/४/२०१० अन्वये सदर शासन निर्णयाचा विभागांना / कार्यालयांना वेळोवेळी उपयोग व्हावा या करीता तो महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटरवर उपलब्ध करण्यात आला असून, त्यांचा संगणक संकेतांक क्रमांक २०१००४२९१७०९४६००१ असा आहे.**

**म.अपर प्रधान मुख्य वनंसरक्षक (प्रशासन-दुय्यमसंवर्ग) नागपुर यांचेकडील पत्र क्रमांक कक्ष-१०(२)/एक/प्रक्र/१९४४ दिनांक १४/३/२०१४ नुसार माजी सैनिकांसाठीवनरक्षक पदासाठी फक्त १० वी चेच गुण विचारात घेऊन निवडयाद्या तयार केल्यास निवड प्रक्रियेत एकसुत्रता राहिल व किमान पात्रता धारण करणा-या माजी सैनिक उमेदारांवर अन्याय होणार नाही. या दृष्टिन माजी सैनिकांसाठी वनरक्षक पदासाठी इयत्ता १० वी चेच गुण विचारात घेण्यात येऊन निवड याद्या तयार करण्या बाबत कार्यवाही करावी असे शासन पत्र क्रमां.एफएसटी-११/१३/प्र.क्र.६१८/फ-४ दिनांक.६ मार्च २०१४ अन्वये निर्देश दिलेले आहेत.**

**विविध शासकीय कार्यालयाव्दारे वेगवेगळया पदांच्या भरतीसाठी ज्याकरीता शैक्षणिक पात्रता ही १२ वी पास असते, त्याकरीता सैन्य सेवेतील पदवी ही ग्राहय धरण्यात येत असते. म्हणून जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांचेव्दारे दिलेल्या खुलाशानुसार अटी व शर्ती पुर्ण करणारे माजी सैनिकांना माजी सैनिक या समांतर आरक्षणाचे पदाकरीता अन्य आवश्यक अटी व शर्तीचे अधिन राहून शैक्षणिक पात्रतेचे दृष्टिने पात्र ठरविण्यात येतील.**

२.१ शासनाने वेळोवेळी घोषित केलेल्या नक्षलग्रस्त भागात वास्तव्य असलेल्या उमेदवारांना खाली नमूद केल्याप्रमाणे शैक्षणिक पात्रतेमध्ये सुट देण्यात येईल.

अनुसूचीत जमाती प्रवर्गातील उमेदवार, नक्षलवाद्यांच्या हल्यात मरण पावलेले किंवा गंभीररित्या जखमी झालेले वनखबरे व वनकर्मचा-यांच्या मुलांनी माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तिर्ण केली असल्यास (इयत्ता १० वी) या पदासाठी पात्र ठरविण्यात येईल.

**टिप :- नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात मरण पावलेले किंवा गंभीररित्या जखमी झालेले वनखबरे व वन कर्मचा-यांचे संबंधात वरील प्रयोजनाकरीता शासकीय वैद्यकिय अधिकारी आणि पोलीस खात्यातील घटनेच्या कार्यक्षेत्रातील सक्षम पोलीस अधिकारी यांचेकडून निर्गमीत केलेले प्रमाणपत्र विचारार्थ घेण्यात यावे.**

३.० वयोमर्यादा :- उमेदवाराचे वय दि.१०/०९/२०१४ रोजी १८ वर्षापेक्षा कमी नसावे आणि २५ वर्षापेक्ष जास्त नसावे.

**३.१ उच्च वयोमर्यादा खालील बाबतीत शिथिलक्षम.**

(एक) महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या मागासवर्गीय उमेदवाराच्या बाबतीत ५ वर्षापर्यंत.

(दोन) **महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शुध्दीपत्रक क्र.मासैक-१०-१०/प्र.क्र.२७९/१०/१६-अ, दि.२० ऑगष्ट, २०१० अन्वये "माजी सैनिकांसाठी शासन सेवेतील वर्ग-३ व वर्ग-४ मधील पदांसाठी नेमणुकीकरीता विहीत वयोमर्यादेतील सुट ही सदर उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक ३ वर्षे इतकी राहील."**

(तीन) पात्र खेळाडुच्या बाबत ५ वर्षापर्यंत

(चार) प्रकल्पग्रस्त व भूकंपग्रस्त उमेदवारांच्या बाबतीत खुल्या प्रवर्गातील उमेदवाराकरिता तसेच मागासवर्गीय उमेदवाराकरिता सरसकट कमाल वयोमर्यादा ४५ वर्ष राहील. सुशिक्षित बेरोजगार व

अंशकालीन उमेदवारांकरीता सरसकट कमाल वयोमर्यादा ४६ वर्ष राहील. (सामप्र शासन निर्णय क्र.पअंक/१००९/प्रक्र.२००/२००९/१६-अ,दिनांक २७/१०/२००९)

(पाच) वनविभागातील अधिसंख्य वनमजूरांना महसूल व वनविभाग शासन शुध्दीपत्रक क्रमांक एलएबी १०९४/ प्र.क्र.२५२/फ-९, दिनांक ३१-७-२००३ नुसार वयोमर्यादेसंबंधी अट शिथिलक्षम.

**४.० वनरक्षक पदासाठी शारीरिक पात्रता.**

| **शारीरीक माप** | **उमेदवाराचा प्रवर्ग** | |
|---|---|---|
| | पुरुष | स्त्री |
| उंची (से.मी. मध्ये ) | १६३ | १५० |
| छातीचा घेर --<br>न फुगवता (से.मी. मध्ये )<br>फुगवून (से.मी. मध्ये) | <br>७९<br>८४ | <br>--<br>-- |
| वजन (कि.ग्र.मध्ये) | वैद्यकीय मापानुसार उंची व वयाच्या योग्य प्रमाणात | वैद्यकीय मापानुसार उंची व वयाच्या योग्य प्रमाणात |
| (अनुसूचित जमाती मधील उमेदवारासाठी खालील प्रमाणे शिथिलक्षम) | | |
| उंची (से.मी. मध्ये) | १५२.५ | १४५ |
| छातीचा घेर --<br>न फुगवता (से.मी. मध्ये )<br>फुगवून (से.मी. मध्ये) | <br>७९<br>८४ | <br>--<br>-- |
| वजन (कि.ग्र.मध्ये) | वैद्यकीय मापानुसार उंची व वयाच्या योग्य प्रमाणात | वैद्यकीय मापानुसार उंची व वयाच्या योग्य प्रमाणात |

(चार) दूर दृष्टी आणि जवळील दृष्टीचे चष्मे व विना चष्म्याचे खालील मानक पूर्ण करतात.

**<u>दूरदृष्टी</u>**

| अधिक चांगला डोळा | वाईट डोळा |
|---|---|
| (सुधारलेली दृष्टी) | |
| ६/६ | ६/१२ |
| किंवा | किंवा |
| ६/९ | ६/९ |

**<u>जवळील दृष्टी</u>**

| अधिक चांगला डोळा | वाईट डोळा |
|---|---|
| (सुधारलेली दृष्टी) | |
| J.१ | J.११ |

प्रत्येक डोळा संपूर्ण क्षेत्र दृष्टीयुक्त असणे आवश्यक आहे.

(ब) शासकीय वैद्यकीय अधिकारी किंवा वैद्यकीय तपासणी संदर्भात प्राधिकृत केलेल्या वैद्यकीय विशेषज्ञांकडून वैद्यकीय पात्रता प्रमाणित करण्यात येईल. वैद्यकीय चाचणीमध्ये तिरळेपणा, रंग व रात आंधळेपणा, आतल्या बाजूला फेंगाडे असलेले गुडघे, सपाट पाय, त्वचा व छातीचे रोग या

संबंधीचा आणि अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग) नागपुर यांनी वेळोवेळी विहित केलेल्या अन्य वैद्यकीय चाचणीचा समावेश राहील.

(क) शासनाने वेळोवेळी घोषित केलेल्या नक्षलग्रस्त भागात वास्तव्य असलेल्या उमेदवारांना खाली नमूद केल्याप्रमाणे शारिरीक पात्रतेमध्ये सुट देण्यात येईल.

नक्षलवाद्यांच्या हल्यात मरण पावलेल्या किंवा गंभीररित्या जखमी झालेल्या वनखबरे व वनकर्मचा-यांचे मुलांना खाली नमूद केल्याप्रमाणे सूट देण्यात येईल.

१) उंची :- पुरूष आणि स्त्री उमेदवारासाठी २.५ से.मी.
२) छाती :- मोजणी आवश्यक नाही.

(ड) **खेळाडू प्रवर्ग :-** विहित शैक्षणिक अर्हता धारण करणा-या व वयोमर्यादेची अट पूर्ण करणा-या खेळाडूना, विहित उंचीमध्ये २.५ से.मी. इतकी सवलत देण्यात येईल.

(इ) **वनकर्मचा-यांचे पाल्यांना शारीरिक अर्हतेत सवलत:-** सेवेत कार्यरत असतांना मृत्यू पावलेल्या वनकर्मचा-यांच्या एका मुलास किंवा मुलीस शारीरिक पात्रतेत खालील प्रमाणे सवलत देण्यात येईल.

(ए) उंची :- पुरुष आणि स्त्री उमेदवारास २.५ से.मी.
(बी) छाती :- पुरुष उमेदवारांना २.० से.मी. न फुगवता व १.५ सेन्मी.फुगवून.

(फ) **किमान सापेक्ष ऊंची, वजन व छातीची मोपमापे :-**
**शासन पत्र क्रमांक एफएसटी-०७/११/प्र.क्र.२८७/फ-४, दि.२४/८/२०११**

**उपरोक्त शासन पत्रातील निर्देशानुसार महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम-१९८१ मधील परिशिष्ट-३ मध्ये महाराष्ट्र वनसेवेतंर्गत निवड करण्यात आलेल्या उमेदवारांसाठी विहीत केलेल्या ऊंची व वजनाच्या तक्त्याप्रमाणे वनरक्षक या पदासाठीही उंचीच्या प्रमाणात वजन आवश्यक राहील. वैद्यकिय तपासणी करणा-या व्यक्तींच्या मार्गदर्शनाकरीता सर्वसाधारण नियमानुसार पुरेशी मानली जाणारी किमान सापेक्ष उंची, वजन व छातीची मोजमापे दर्शविणारा तक्ता नमुद आहे. त्याप्रमाणे कार्यवाही होईल.**

## ५. निवडीची पध्दत :-

५.१ उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवासी असावा व त्याची नाशिक व अहमदनगर जिल्हयातील आदिवासी दुर्गम भागात काम करण्याची तयारी असावी.

५.२ वनरक्षक पदाच्या सेवाप्रवेश नियमानुसार उमेदवार किमान शारीरीक पात्रता धारण करतात किंवा कसे हे निश्चित करण्याच्या दृष्टीने उमेदवारांची मोजमापे स्थानिक शासकीय वैद्यकिय अधिकारी यांच्या उपस्थितीत घेण्यात येतील.

५.३ जे उमेदवार किमान शैक्षणिक पात्रता, वयोमर्यादेची अट तसेच किमान शारीरीक पात्रता धारण करतात त्या पात्र उमेदवारांची खालील प्रमाणे शारीरीक क्षमता चाचणी घेण्यात येईल.

बहुतांश वनक्षेत्र हे भौगोलीक दृष्टया दुर्गम क्षेत्रात अस्तित्वात आहे. वनरक्षक हे वनविभागातील क्षेत्रीय स्तरावरील आघाडीवरील पद **(Frontline Staff)** असून वनरक्षकाने वनसंरक्षणाच्या दृष्टिने वनक्षेत्रात पायी फिरून गस्त घालणे आवश्यक असते. त्यामुळे वनरक्षक या पदासाठी पुरुष उमेदवारांना २५ कि .मी. चालणे (चार तासात) व महिला उमेदवारांना १६ कि.मी. चालणे (चार तासात) अशी शारीरीक क्षमता चाचणी विहित करण्यात येत आहे.

**त्यामुळे शारीरीकदृष्टया सक्षम उमेदवारांची प्राधांन्याने निवड करण्याच्या दृष्टीने विहित केलेल्या शारीरिक मोजमापाप्रमाणे व शारीरिक दृष्टया सुदृढ असल्याबाबत वैद्यकिय प्रमाणपत्र धारण करणा-या पात्र ठरलेल्या उमेदवारांची प्रथम शारीरीक क्षमता चाळणी चाचणी घेण्यात येईल. ही चाळणी चाचणी स्पर्धात्मक स्वरुपाची व बाद पध्दतीची असेल यामध्ये प्रथम येणारे पदसंख्येच्या ३ पट एवढे उमेदवार पुढील फेरीसाठी पात्र ठरविण्यात येतील. उमेदवारांची संख्या निश्चित करतांना विहित करण्यात आलेले आरक्षणही विचारात घेण्यात येईल.**

**धावण्याची चाळणी चाचणी पुरुष उमेदवारांनी ५ कि.मी. व महिला उमेदवारांनी ३ कि.मी.जास्तीत जास्त ३० मिनीटामध्ये पूर्ण करणे आवश्यक राहील.**

**शासन निर्णय दिनांक २२/०८/२०१२ मधील भरतीसंबंधी कार्यपध्दतीमध्ये शारीरिक क्षमता चाळणी चाचणी परिक्षेकरिता शारीरिक दृष्टया सुदृढ असल्याबाबत शासकीय वैद्यकिय अधिका-याकडून तपासणी करुन तसे प्रमाणपत्र संबंधीत उमेदवाराने धावण्याच्या चाळणी परिक्षेकरिता सोबत आणणे आवश्यक आहे अशा प्रमाणपत्राशिवाय त्या उमेदवारांची धावण्याची चाचणी घेतली जाणार नाही याबाबत उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

५.४ (i) वरील प्रमाणे पुढील फेरीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांचे उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इयत्ता १२ वी) गणित विषयासह किंवा विज्ञान व गणित या विषयासह उत्तीर्ण केली आहे. व (ii) शासनाव्दारे घोषित नक्षलग्रस्त भागात वास्तव्य असलेल्या अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवार, नक्षलवादयांच्या हल्ल्यात मृत्यू व जखमी झालेले असे वनखबरे व अशा वनकर्मचाऱ्यांच्या मुलांसाठी इ. १० मधील (माध्यमिक शालांत परिक्षा) एकूण गुण विचारात घेवून गुणानुक्रम निश्चित करण्यात येईल. इ. १० वी / १२ वी मधील गुणांना ८७.५ % ऐवढे भारांकन **(Weightage)** देण्यात येईल. (टीप :- १० वी १२ वी /तत्सम समकक्ष परिक्षा एकापेक्षा जास्त संधीत उत्तीर्ण झाली असेल तर त्या प्रत्येक परीक्षेचे गुणपत्रक (मार्कलिस्ट) निवड चाचणीच्या वेळी समक्ष आणणे आवश्यक आहे अशी सर्व गुणपत्रके न आणल्यास असा उमेदवार अपात्र समजला जाईल.)

५.५ गुणवत्ता यादी तयार करतांना इ.१२ वी मधील व नक्षलग्रस्त भागात वास्तव्य असलेल्या अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवार, नक्षलवादयांच्या हल्ल्यात मृत्यू व जखमी झालेले असे वनखबरे व अशा वन कर्मचाऱ्यांच्या मुलांसाठी इ.१० वी मधील (माध्यमिक शालांत परिक्षा) गुणांच्या आधारे गुणवत्ता विचारात घेण्यांत येईल.

५.६ वनरक्षक भरती प्रक्रिये संबंधात धावण्याच्या चाचणी परिक्षेमध्ये प्राप्त होणा-या गुणांना १२.५ % भारांकन देण्यासाठी शासनाने महसूल वनविभाग शासन पत्र क्र. एफएसटी-०७/११/प्र.क्र.२८७/फ-४ दिनांक २१.७.२०१४ अन्वये खालील प्रमाणे मंजूरी प्रदान केलेली आहे.

१.०० पहिल्या येणा-या ३ उमेदवारास (क्र.१ ते ३ वरील आलेले) यांना प्रत्येकी १० गुण
२.०० त्यानंतर येणा-या ५ उमेदवारास (क्र.४ ते ८ वरील आलेले) यांना प्रत्येकी ८ गुण
३.०० त्यानंतर येणा-या ७ उमेदवारास (क्र.९ ते १५ वरील आलेले) यांना प्रत्येकी ६ गुण
४.०० त्यानंतर येणा-या १० उमेदवारास (क्र.१६ ते २५ वरील आलेले) यांना प्रत्येकी ४ गुण
५.०० त्यानंतर येणा-या १५ उमेदवारास (क्र.२६ ते ४० वरील आलेले) यांना प्रत्येकी २.५ गुण

५.७ वरीलप्रमाणे शैक्षणिक अर्हता परिक्षेमध्ये प्राप्त गुणांच्या टक्केवारीचे ८७.५ टक्के केलेले भारांकन व १२.५ टक्के भारांकन करिता धावण्याच्या चाचणी परिक्षमध्ये प्राप्त केलेले गुण यांची बेरीज करुन उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करण्यांत येईल.

**उदा. श्री "क" या उमेदवारांनी शैक्षणिक अर्हता परिक्षा ( उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परिक्षा विज्ञान) मध्ये एकूण निर्धारित ५०० गुणांपैकी ३०० गुण प्राप्त केले आहे. त्यांची टक्केवारी ६० टक्के येईल, त्यांचे ८७.५ भारांकन म्हणजे ५२.५० एवढे येईल. तसेच ५ कि मी/३ कि मी धावण्याच्या चाचणी परिक्षेत समजा तो ७ व्या क्रमांकावर आलेला आहे, तर उर्वरित १२.५ टक्के भारांकन करिता त्यांना दिनांक.२१/७/२०१४ च्या शासन पत्रानुसार १२.५पैकी ८ गुण मिळतील. याप्रमाणे गुणवत्ता यादी करीता त्यांना मिळणारे गुण ५२.५० + ८ = ६०.५० टक्के अशा प्रकारे गणना केली जाईल.**

५.८ शासन निर्णय क्रमांक एफएसटी-०७/११/प्र.क्र.२८७/फ-४, दि.३० जुलै, २०११ अन्वये २५ कि.मी.पुरूष उमेदवारासाठी तर १६ कि.मी. स्त्री उमेदवारासाठी चालण्याची शारिरिक क्षमता चाचणी घेण्यात येईल. उपरोक्त चाचणी ही चार तासांमध्ये पुर्ण करणे बंधनकारक राहील.

**निवड प्रक्रियेचे वेळापत्रक**

| अ.क्र. | टप्पा | दिनांक |
|---|---|---|
| १ | (अ) विविध प्रसार माध्यमातुन प्रसिध्दी देऊन अर्ज मागविणे. वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करण्याची अंतिम तारीख | दिनांक १४/०८/२०१४ |
| | (ब) कार्यक्षेत्रात असलेल्या सेवायोजन कार्यालय/समाज कल्याण अधिकारी कार्यालय/प्रकल्पग्रस्त उमेदवारांसाठी जिल्हाधिकारी/जिल्हा सैनिक बोर्ड/आदिवासी प्रकल्प अधिकारी यांचे स्तरावरुन इच्छुक उमेदवारांना रिक्त पदांची माहिती कळवून पत्र देणे | दिनांक.२६/०८/२०१४ |
| | (क) विविध माध्यमातून अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख | दिनांक.१०/०९/२०१४ |
| २ | प्राप्त अर्जाची तपासणी पूर्ण करण्याची अंतिम तारीख | दिनांक १७/०९/२०१४ |
| ३ | प्राप्त अर्जाची छाननी नंतर पात्र उमेदवारांची नांवे व त्यांचे शारिरीक पात्रत तपासणी व प्रथम धावण्याची चाचणी कार्यक्रम प्रसिध्द करणे. | दिनांक २२/०९/२०१४ |
| ४ | उमेदवारांची शारीरीक पात्रता तपासणे (ऊंची व छातीचे माप ठरवून दिलेल्या मापदंडानुसार तपासणे) | दिनांक २९/०९/२०१४ ते ०१.१०.२०१४ |
| ५ | वनरक्षक पदासाठी पात्र उमेदवारांची प्रथम (५ कि.मि./३ कि.मि.) धावण्याची चाळणी चाचणी घेणे. | |
| ६ | प्रथम धावण्याची चाळणी चाचणी नंतर पात्र झालेल्या उमेदवारांची यादी तसेच प्रमाणपत्र तपासणी कार्यक्रम प्रसिध्द करणे | दिनांक ०८/१०/२०१४ |

| | | |
|---|---|---|
| ७ | प्रथम धावण्याच्या चाळणी चाचणी नंतर पात्र झालेल्या उमेदवारांची प्रमाणपत्रांची तपासणी | दिनांक १३/१०/२०१४ ते १४/१०/२०१४ |
| ८ | प्रमाणपत्र तपासणीनंतर पात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे तसेच त्यांची शारिरीक क्षमता चाचणी (४ तासात २५ कि.मि./१६ कि.मि.चालणे) करिता कार्यक्रम प्रसिध्द करणे | दिनांक १७/१०/२०१४ |
| ९ | पात्र उमेदवारांची ४ तासात २५ कि.मि./१६ कि.मि.चालण्याची चाचणी | दिनांक २०/१०/२०१४ ते २२/१०/२०१४ |
| १० | निवड यादी तयार करुन जाहिर करणे (उमेदवाराची शैक्षणिक अर्हता परिक्षेमध्ये प्राप्तगुणांचे ८७.५ टक्के भारांकन + ५ कि.मि./३ कि.मि. मध्ये मिळालेल्या गुणांची बेरीज | दिनांक २९/१०/२०१४ |
| १० | i) नियुक्ती आदेश देण्यापूर्वी वैद्यकीय तपासणी प्रमाणपत्र सादर करणे बाबत पत्र देण्याची तारीख<br>ii) वैद्यकीय तपासणी प्रमाणपत्र सादर करण्याची तारीख | दिनांक ०१/११/२०१४<br>दिनांक १७/११/२०१४ |
| ११ | सक्षम प्राधिकारी यांनी नेमणूकीचे आदेश देण्याची तारीख | दिनांक १८/११/२०१४ |

11. (i) शारीरीक पात्रता तपासणीचे स्थळ आणि वेळ. :-
    (ii) शारीरीक क्षमता चाचणीचे स्थळ आणि वेळ. :

याबाबत सुचना वेळोवेळी **forest.erecruitment.co.in** तसेच वनविभागाच्या www.mahaforest.gov.in या संकेतस्थळावर देणेत येईल.

(टिप :- खालील माहिती या वनवृत्ताचे www.mahaforest.gov.in व **forest.erecruitment.co.in** या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द केली जाईल. याबाबत वेगळयाने पत्रव्यवहार केला जाणार नाही.)

१) चालण्याच्या चाचणीनंतर पात्र /अपात्र उमेदवारांची यादी

२) शारीरिक तपासणीचा कार्यक्रम

३) उमेदवार हा शारीरिक क्षमता चाचणीकरीता शारीरिक दृष्टया सुदृढ असल्याबाबतचे प्रमाणपत्र संबंधित उमेदवारांनी शासकीय वैद्यकीय अधिकारी यांचेकडून प्राप्त करुन घेवून धावण्याच्या चाळणी परिक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

४) पुरुष उमेदवारांकरिता ५ कि.मी. व स्त्री उमेदवारांकरिता ३ कि.मी. धावण्याच्या कार्यक्रमाचे नियोजन या वनवृत्तातील विभागीय स्तरावर आयोजित केले जाईल याबाबतची माहिती संकेतस्थळावर प्रसिध्द केली जाईल.

५) उमेदवाराचे धावण्याच्या चाचणीतील वेळ इ.माहिती

६) वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येणा-या भरतीप्रक्रियेबाबतच्या सुचना

**<u>निवडसूचीत समाविष्ट करावयाच्या उमेदवारांची संख्या :-</u>**

निवडसूचीमध्ये समाविष्ट करावयाच्या प्रवर्गनिहाय उमेदवारांची संख्या खालील प्रमाणे असेल. (सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक.प्रानिमं-२००७४/प्र.क्र.४६/०७/१३-अ दिनांक.१९/१०/२००७)

| अ.क्र. | प्रवर्गनिहाय रिक्त पदांची संख्या | निवडसुचीमध्ये समाविष्ट करावयाच्या उमेदवारांची प्रवर्गनिहाय संख्या |
|---|---|---|
| १ | १० पदापर्यंत | रिक्त पदे अधिक रिक्त पदांच्या ५० टक्के इतक्या अतिरिक्त उमेदवारांचा समावेश करणेंत येईल |
| २ | ११ ते ३० | रिक्त पदे अधिक रिक्त पदांच्या २५ टक्के इतक्या अतिरिक्त उमेदवारांचा परंतु किमान ०५ इतक्या अतिरिक्त उमेदवारांचा समावेश करणेंत येईल |
| ३ | ३१ हून अधिक | रिक्त पदे अधिक रिक्त पदांच्या २० टक्के इतक्या अतिरिक्त उमेदवारांचा परंतु ०८ इतक्या अतिरिक्त उमेदवारांचा समावेश करणेंत येईल |

वरीलप्रमाणे अतिरिक्त उमेदवारांच्या संख्येची परिगणना करतांना उमेदवारांची संख्या अपूर्णांकात येत असल्यास पुढील संख्या विचारात घेण्यांत येईल. त्याचप्रमाणे निवडसूचीसाठी रिक्त पदाची संख्या विचारात घेतांना अर्ज स्विकारण्याची अंतिम तारखेपर्यंत निवड समितीकडे लेखी स्वरुपात प्रत्यक्ष मागणी प्राप्त झालेली असेल तितकीच रिक्त पदे निवडसूचीसाठी विचारात घेण्यात येतील व कोणती पदे कार्यालय निहाय व प्रवर्गनिहाय निवडसूची तयार करतांना विचारात घेण्यात आली आहेत याची लेखी स्वरुपात निवड समितीकडे नोंद ठेवण्यांत येईल.

**<u>निवडसूचीची कालमर्यादा :-</u>**

दिनांक १९.१०.२००७ च्या आदेशातील परिच्छेद क्र.९ येथिल तरतुदीमध्ये बदल करण्यात येत असुन यापुढे निवडसमितीने तयार केलेली निवडसूची १ वर्षासाठी किंवा निवड सूची तयार करतांना ज्या दिंनांकापर्यंतची रिक्त पदे विचारात घेण्यांत आली आहेत, त्या दिंनांकापर्यंत जे नंतर घडेल त्या दिनांकापर्यंत विधिग्राह्य ठरेल. त्यानंतर ही निवड सुची व्यपगत होईल.

निवड समितीने तयार केलेल्या निवडसुचीमधून जेष्ठतेनुसार उमेदवारांची नियुक्तीसाठी शिफारस केल्यानंतर शिफारस केलेल उमेदवार सदर पदावर हजर न झाल्यास किंवा संबंधित पदाच्या सेवा प्रवेश नियमातील तरतुदीनुसार किंवा जात प्रमाणपत्र किंवा अन्य कोणत्याही कारणास्तव संबंधित उमेदवार पात्र ठरत नसल्याचे आढळून आल्यास निवडुचीतील अतिरिक्त उमेदवारांमधून अन्य उमेदवारांची नियुकती करण्यांत येईल.

## ६. सर्वसाधारण अटी :-

६.१. सेवाप्रवेश नियमातील अटीनुसार संबंधित संवर्गातील उमेदवारांना मराठी भाषा वाचता, लिहिता व बोलता येणे आवश्यक आहे.

६.२ उमेदवार महाराष्ट्र राज्याचा कायमचा रहिवासी असावा.

६.३ "महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक भुकंप-१००९/प्र.क्र.२०७/२००९/१६-अ, दिनांक २७/८/२००९ अन्वये प्रकल्पगंस्तांना असलेले ५% समांतर आरक्षण तसेच भुकंपग्रस्तांसाठी स्वतंत्रपणे २% समांतर आरक्षण लागू राहील"

६.४ शासन,सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-१०१२/प्रक्र.१६/१२/१६-अ, दिनांक १३/८/२०१४ अन्वये दिनांक १६/३/१९९९ मधील परिच्छेद-५ मध्ये विहीत करण्यात आलेल्या कार्यपध्दतीमध्ये मार्गदर्शनार्थ स्पष्टीकरणाचा समावेश करण्यांत आल्याने सदर परिपत्रकातील च्अछ,च्बछ,च्कछ नुसार सरळसेवेने नियुक्ती करतांना समांतर आरक्षण कार्यपध्दतीचा अवलंब केला जाईल.

६.५ वि.जा.(अ), भ.ज. (ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), विमाप्र, व इमाव या प्रवर्गातील उमेदवारासाठी शासन परिपत्रक सामान्य न्याय, सांस्कृतीक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.सी.बी.सी-१०/२००६ /प्र.क्र.१५/ मावक-५ दिनांक ३०/६/२००६ सोबतच्या सुधारित नमुन्यात उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमीलेअर) निकटतम वर्षाचे कालावधीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच शैसामाप्र आणि विमाप्रअ करिता शासन निर्णय दिनांक १५.७.२०१४ व १९.७.२०१४ नुसार सुधारीत प्रमाणपत्र अर्जाच्या दिनांकास अर्जदाराजवळ असणे आवश्यक आहे.

खुल्या प्रवर्गातील व मागासप्रवर्गातील इतर मागासवर्ग, भटक्या जमाती (क) व भटक्या जमाती (ड) या प्रवर्गातील महिलासाठी असलेले ३० टक्के आरक्षण उन्नत व प्रगत व्यक्ति/गटातील (क्रिमीलेअर) कुटुंबातील महिला सदस्यांना अनुज्ञेय राहणार नाही.

६.६ महिला आरक्षणा करिता अर्ज करतांना खुल्या प्रवर्गातील व मागास प्रवर्गातील इतर मागास वर्ग, भटक्या जमाती (क) व भटक्या जमाती (ड) तसेच शैसामाप्र आणि विमाप्रअ या प्रवर्गातील महिला उमेदवारानी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमीलेअर) निकटतम वर्षाचे कालावधीचे सक्षम प्राधिका-यांचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

६.७ रोजगार कार्यालय, जिल्हा समाज कल्याण कार्यालय, सैनिक कल्याण कार्यालय इत्यादि कार्यालयाकडे नोंदणीकृत असलेल्या उमेदवारांनी देखील परस्पर विहित केलेल्या पध्दती प्रमाणे अर्ज सादर करावा.

६.८ अनुभवाच्या बाबतीत तासीका, नियत कालीक, अंशकालिक, विद्यावेतन, अभ्यागत, अंशदानात्म्क, विद्यावेतन तत्वावर केलेल्या अंशकालीन सेवेचा कालावधी तसेच प्रभारी म्हणून नेमणूकीचा कालावधी, अतिरिक्त कार्यभाराचा कालावधी अनुभवासाठी ग्राहय धरता येणार नाही.

६.९ पडताळणी अंती अर्ज रद्य ठरविणे, निवड प्रक्रियेत वेळेवर बदल करणे, उमेदवारांची अंतिम निवड करणे, जाहिरातीचे अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करणे या बाबतचे संपुर्ण अधिकार निवड समितीने राखुन ठेवले आहे.

६.१० सेवाशर्तीनुसार अपात्र ठरलेल्या उमेदवारांना भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर वगळण्यात येईल.

६.११ उमेदवारांना शारिरीक क्षमताचाचणी परिक्षेकरिता कोणत्याही प्रकारचा भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

६.१२ वनविभागातील वनरक्षक या पदावर नियुक्ती करतांना एकूण ५% पदे होमगार्डस मध्ये कमीत कमी ३ वर्षे इतकी सेवा झालेल्या व वनरक्षक पदासाठी आवश्यक शैक्षणिक/शारिरीक पात्रता पुर्ण करणा-या विहीत वयोमर्यादेतील तसेच विहीत पात्रता परिक्षा उत्तीर्ण होणा-या होमगार्डस मधून भरण्यात येतील.

६.१३ "सुशिक्षीत बेरोजगारांना अर्थसहाय्य' या योजनेअंतर्गत शासकीय कार्यालयामध्ये ३ वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केलेल्या पदविधर / पदविकाधारक अंशकालीन उमेदवारांना शासकीय/निमशासकीय सेवेतील महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील गट-क पदावरील सरळसेवेने करावयाच्या नियुक्त्यांसाठी १० % समांतर आरक्षण लागू करण्यात येत आहे व त्यांना सध्याच्या ४५ वर्षे मर्यादेत आणखी १ वर्षाने वाढ करून सदर सवलत ४६ वर्षापर्यंत देण्यात येईल."

## ७. सेवाशुल्क :-

उमेदवाराने उपरोक्त पदासाठी आवश्यक असलेले शुल्क खालीलप्रमाणे महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादीत (एमकेसीएल) या संस्थेच्या मार्गदर्शक सुचनेमध्ये दिलेल्या पध्दतीने जवळच्या भारतीय स्टेट बॅन्क शाखेमध्ये भरणा करणे आवश्यक आहे.

| प्रवर्ग | शुल्क |
|---|---|
| खुला | ५०० |
| मागासवर्गीयांकरीता | २५० |
| माजी सैनिक | नाही |

**महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक आरटीए-१०७९/०/४८२/१६-अ, दिनांक ३ जुलै,१९८० मधील परिच्छेद क्रमांक २ मध्ये माजी सैनिकांना परिक्षा फी तसेच अर्जाचे फी मध्ये सुट दिलेली आहे.**

### ऑनलाईन अर्ज करण्यासाठी मार्गदर्शक सुचना

| अ.क्र. | कार्यक्रम | दिनांक | |
|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत |
| १ | अर्ज ऑनलाईन नोंद (रजीस्ट्रेशन करण्याचा कालावधी | १४.८.२०१४ | ८.९.२०१४ |
| २ | संगणकीय चलनाद्वारे स्टेट बॅन्क ऑफ इंडीया एसबीआय यांचे शाखेमध्ये फी स्विकृतीचा कालावधी | १४.८.२०१४ | १०.९.२०१४ |
| ३ | ज्या उमेदवारांनी बॅन्केमध्ये दि.१०/०९/२०१४ पर्यंत भरती प्रक्रिया शुल्क जमा केले असेल त्यांच्यासाठी उरलेला ऑनलाईन अर्ज भरण्याचा कालावधी | १२.९.२०१४ | |

(उपरोक्त संवर्गातील रिक्त पदसंख्या, त्या पदाकरीता विहीत केलेली वेतनश्रेणी/शैक्षणिक अर्हता/अनुभव शारीरिक पात्रता/वयोमर्यादा इत्यादिचा तपशिल वर नमुद केलेप्रमाणे आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज दिनांक १०/०९/२०१४ रोजी सायंकाळी ६.०० वाजपर्यंत स्विकारले जातील.

## ८.	अर्ज करण्याची पध्दत :-

१) ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याबाबत सविस्तर सुचना MKCL या संस्थेच्या forest.erecruitment.co.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी उमेदवार MKCL यांच्या अधिकृत प्रशिक्षण केंद्राची मदत व मार्गदर्शन घेवू शकतील. अधिकृत प्रशिक्षण केंद्राची (Authorised Learning Center) पत्त्यासह माहिती forest.erecruitment.co.in या संकेतस्थळावर देखील उपलब्ध आहे.

२) उमेदवाराने उपरोक्त नमुद केलेल्या संकेतस्थळावर (website) Apply online या लिंकवर क्लिक करावे व सर्वप्रथम प्राथमिक माहिती भरावी यानंतर रजिस्टर (Register) या बटनावर क्लिक करुन अर्जाची नोंदणी करावी. केवळ नोंदणी (Registration) केली म्हणजे अर्ज भरला असे होत नाही.

३) नोंदणी झाल्यानंतर उमेदवाराने अर्ज क्रमांक (Application form No.) व पासवर्ड (Password) काळजीपुर्वक स्वत:कडे पुढील प्रक्रियेसाठी जपुन ठेवावा.

४) त्यानंतर नोंदणी झाल्यानंतर उमेदवाराने प्रिंट चलन (print challan) या बटनावर क्लिक करुन चलन प्रिंट करावे.

५) या प्रिन्ट केलेल्या बँक चलनावर नमूद केलेली फि केवळ स्टेट बँक ऑफ इंडिया (SBI) यांच्या कोणत्याही शाखेमध्ये दुस-या दिवशी तसेच वरील तक्त्यातील वेळापत्रकात नमुद केलेल्या मुदतीच्या आत कार्यालयीन वेळेत भरणे आवश्यक राहील व त्याची एक प्रत स्वत:कडे जपुन ठेवावी. अर्जाची फी भरण्यासाठी बँकेने आकारलेले शुल्क उमेदवाराने बँकेत भरावे.

६) बॅन्केत फि भरल्यानंतर दुस-या दिवशी उमेदवाराने आपला उर्वरीत अर्ज भरावा.

७) उर्वरित अर्ज सादर करतांना उमेदवाराने स्वत:चे अद्यावत (Lattest) फोटो व स्वत:ची स्वाक्षरी दोन्ही स्कॅन करुन अपलोड करणे अनिवार्य आहे.

८) उमेदवाराने संपुर्ण अर्ज ऑनलाईन भरल्यानंतर अर्जाची प्रिंट कॉपी काढून घेवून ती स्वत:जवळ ठेवावी

९) वरील सर्व (उमेदवार नोंदणी, बॅक प्रक्रिया, उर्वरित अर्ज भरणे ) प्रक्रिया पुर्ण केल्यानंतर उमेदवार पात्र होईल.

१०) उमेदवाराच्या माहिती व मदतीकरीता मे.एम.के.सी.एल. यांच्या कॉल सेंटरवरील दुरध्वनी क्रमांक ९३२६५५२५२५ वर उमेदवारांना योग्य ते मार्गदर्शन उपलब्ध होईल.

११) उमेदवारांना परिक्षेचे शुल्क एसबीआय व्यतिरिक्त डेबीट/क्रेडीट कार्ड अथवा नेट बँकींगव्दारे सुध्दा भरता येतील. त्यासाठी लागणारे सेवा शुल्क उमेदवाराने स्वत: भरावे.

## ९. महत्वाच्या सुचना

१) पोस्टाने अथवा इतर कोणत्याही प्रकारे आलेले अर्ज स्विकारता येणार नाही. ऑनलाईन पध्दतीने अर्जाची प्रत या कार्यालयास समक्ष अथवा पोष्टाने पाठवू नये.

२) उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने अर्ज करताना शैक्षणिक प्रमाणपत्रे व अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक नाही तथापी ऑनलाईन अर्जामध्ये संपुर्ण माहिती भरणे आवश्यक आहे ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरताना काही त्रुटी राहील्यास अर्ज संगणकाद्वारे स्विकारला जाणार नाही त्यामुळे उमेदवाराने अर्ज परिपूर्ण भरण्याची दक्षता घ्यावी. मुळ कागदपत्रे मागणी/वेळापत्रकानुसार वेळोवेळी तपासण्यासाठी सादर करणे आवश्यक राहील.

३) गुणानुक्रमे व आरक्षण विचारात घेवून पात्र झालेल्या उमेदवारांची नावे महाराष्ट्र ज्ञान महामंडळ (एमकेसीएल) या संस्थेच्या forest.erecruitment.co.in या संकेतस्थळावर जाहिर करण्यात येतील.

४) वनरक्षक पदासाठी धावण्याची चाळणी चाचणी ही उमेदवारांची **कोणतीही कागदपत्रे तपासणी न करता घेतली जाणार असल्याने** या परिक्षेत मिळालेल्या गुणांचे आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाही. कागदपत्रांच्या पुर्ण छाननीनंतर तसेच शारीरिक पात्रतेच्या पुर्ततेच्या अधीन उमेदवारांची गुणवत्तेच्या आधारे सामाजिक /समांतर आरक्षण निहाय अंतिम निवड केली जाईल.

५) जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र या कार्यालयात नावनोंदणी केली असली तरी वरील पदांसाठी विहित नमुन्यात स्वतंत्रपणे रितसर ऑनलाईन अर्ज भरणे आवश्यक राहील.

६) अर्ज एकदा ऑनलाईन सादर केल्यानंतर त्यात कोणत्याही प्रकारे बदल करता येणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. त्यासाठी अर्ज करतेवेळी उमेदवारांनी आवश्यक सर्व तपशिल स्वत:जवळ तयार ठेवावा व अर्ज योग्य पध्दतीने भरला आहे याची खात्री करावी.

## १०. भरती बाबत अर्जदारासाठी इतर आवश्यक सूचना :-

१०.१ प्रत्येक पदासाठी स्वतंत्रपणे आवेदनपत्र भरणे आवश्यक राहील.

१०.२ निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्यावर अयशस्वी ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही किंवा त्यांना लेखी सूचना दिली जाणार नाही.

१०.३ निवड होऊन नियुक्ती मिळालेल्या उमेदवारांना नियमानुसार प्रशिक्षण, विभागीय परीक्षा, विहित केलेल्या भाषेची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

१०.४ आरक्षित पदांकरिता उमेदवारांनी जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे वैध प्रमाणपत्र शासनाचे प्रचलित नियमानुसार विहित वेळात सादर करणे आवश्यक राहील.

१०.५ उमेदवारांनी त्यांच्या उमेदवारीच्या संबंधात कोणत्याही प्रकारचा वशीला किंवा दबाव आणण्याचा किंवा गैरप्रकारचा अवलंब केल्यास त्याची उमेदवारी अपात्र ठरविली जाईल.

१०.६ निवड झालेल्या उमेदवारांची वनवृत्ता अंतर्गत ग्रामीण व दुर्गम क्षेत्रात कोठेही नियुक्ती होऊ शकते.

१०.७ पदभरती प्रक्रियेच्या वेळी उमेदवारास कोणतीही शारीरिकदृष्टया इजा पोहचल्यास अथवा नुकसान झाल्यास त्यास शासन जबाबदार राहणार नाही.

१०.८ वनरक्षक पदावर नियुक्ती केलेल्या उमेदवारांची आंतरवृत्तीय बदली होणार नाही याची नोंद संबंधित उमेदवारांनी घ्यावी.

सही/-
**सदस्य सचिव**
**प्रादेशिक भरती प्रक्रिया समिती, २०१४**
**नाशिक वनवृत्त, नाशिक**

परिशिष्ठ -१ (ब)
अर्जाचा नमुना

| उमेदवराचे अलीकडील साक्षांकित केलेले पासपोर्ट आकाराचे छायाचित्र |
|---|

जाहिरात क्रमांक १ दिनांक /८/२०१४

अर्जदाराने कोणत्या प्रवर्गात अर्ज केला :- प्रवर्ग--------------------समांतर आरक्षण----------

१. अर्ज केलेल्या पदाचे नांव :- -------------------

| २. उमेदवारांचे पुर्ण नांव | आडनांव | नांव | वडिलांचे /पतीचे नांव |
|---|---|---|---|
| मराठी | ----------- | ------------ | ----------------- |
| इंग्रजी | ------------ | ------------ | ----------------- |

३. कायमचा पत्ता : ----------------------------------
-----------------------------------
-----------------------------------

४. पत्रव्यवहाराचा सध्याचा संपुर्ण पत्ता : - ----------------------------------------
---------------------------------------
---------------------------------------

पिन कोड क्रमांक | | | | | | | मोबाईल क्रमांक ----------------

५ अ. अर्जदार कोणत्या प्रवर्गातील आहे यापैकी लागू असलेल्या प्रवर्गासाठी ( √ ) अशी खुण संबंधित प्रवर्गाच्या रकान्यात करावी.

| अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज (क) | भ.ज. (ड) | विमाप्र | इमाव | शैक्षणिक आणि सामाजिक दृष्टया मागास प्रवर्ग | विशेष मागास प्रवर्ग-अ | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | |

५ (ब) जात (मागासवर्गीय असल्यास जात/पोटजात व प्रवर्ग जाती किंवा वैधता प्रमाणपत्रानुसार) नमूद करावी.

६ राष्ट्रीयत्व

७ महाराष्ट्र राज्याचे कायमचे रहिवासी आहात काय? होय / नाही

८ उमेदवार पुरुष किंवा स्त्री आहे पुरुष / स्त्री

९ अ उमेदवार उन्नत व प्रगत (क्रिमीलेयर) गटामधील आहे काय? होय / नाही

९ ब उन्नत व प्रगत गटात नसल्याचे (नॉन क्रिमीलेअर) निकटतम वर्षाचे कालावधीचे प्रमाणपत्र आहे काय. होय / नाही

१० उमेदवार प्रकल्पग्रस्त/भुकंपग्रस्त आहे कांय होय / नाही

११ नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात मरण पावलेल्या किंवा गंभीर रित्या जखमी झालेल्या वनखबरे/वनकर्मचा-यांचे पाल्य आहे कांय १ होय / नाही

१२ उमेदवार स्वातंत्र सैनिकाचा पाल्य आहे कांय होय / नाही

१३ उमेदवार अति उच्च गुणवत्ताधारक खेळाडू आहे कांय होय / नाही

१४ अ उमेदवार माजी सैनिक आहे काय होय / नाही

१४ ब उमेदवार लष्करी कार्यवाहीत मृत्यू पावलेल्या कुटुंबियापैकी आहे कांय होय / नाही

१४ क उमेदवार १९७७.७९ साली झालेल्या शासकिय कर्मचा-यांच्या संपकाळात तात्पुरती नियुक्ती केलेला व सध्या बेरोजगार असलेला संपकालीन कर्मचारी आहे काय. होय / नाही

१५ जन्मतारीख (शाळा सोडल्याच्या दाखल्यानुसार) दिनांक -- महिना -- वर्ष ---

१६ दिनांक १० /०९/२०१४ रोजीचे वय -- वर्ष-- महिना -- दिवस (उमेदवाराचे वय दि.१०/०९/२०१४ रोजी १८ वर्षापेक्षा कमी नसावे आणि २५ वर्षापेक्ष जास्त नसावे.
मागासवर्गीय उमेदवारांचे बाबतीत ५ वर्षापर्यत शिथील

१७ जन्म ठिकाण : गांव/शहर -- जिल्हा -- राज्य --

१८ मातृभाषा व इतर भाषेचे ज्ञान(अवगत असलेली भाषा)

१९. शैक्षणिक अर्हता किंवा तत्सम परिक्षेपासुन उत्तीर्ण सर्व परिक्षेचा तपशील

| अ.क्र | परीक्षेचे नांव | शाळेचे/बोर्डाचे/विद्यापीठाचे /संस्थेचेनांव | विषय | परिक्षेत मिळालेले गुण | टक्केवारी | परीक्षा उतीर्ण झाल्याचे वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | माध्यमिक शालांत परिक्षा | | | | | |
| २ | उच्च माध्यमिक शालांत परिक्षा | | | | | |
| ३ | मान्यताप्राप्त विद्यापिठाची पदवी | | | | | |
| ४ | पदयुत्तर | | | | | |
| ५ | इतर | | | | | |

२०. संगणक प्रशिक्षित आहात काय? (शासन मान्य एम.एस.सी.आय.टी.) होय/ नाही

२१. अनुभव प्राप्त असल्यास त्याचा तपशील

२२. पूर्वी आणि सध्या करीत असलेल्या नोकरीचा तपशील

| कार्यालयाचे/ विभागाचे नांव व पत्ता | धारण केलेले पद | वेतनश्रेणी | स्थायी किंवा तात्पुरती | रुजू झाल्याची तारीख | नोकरी सोडली /सपली असल्यास/ दिनांक व सोडण्याची कारणे. |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

२३. (अ) आदिवासी प्रकल्प अधिकारी / सेवा आयोजन कार्यालय / समाजकल्याण कार्यालय/जिल्हाधिकारी यांच्याकडे नांव नोंदणी केली आहे काय ? होय / नाही

(ब)नांव नोंदणी केले असल्यास नोंदणीचे ठिकाण नोंदणी क्रमांक, नोंदणी वर्ष.

नोंदणीचे ठिकाण --------- नोंदणी क्रमांक --------- नोंदणी वर्ष ---------

(क) नुतनिकरणाचा दिनांक : ____________________________

२४. लागू असलेल्या बाबीवर ( ✓ ) अशी खुण करावी

अ) विवाहित / अविवाहित

ब) विधुर /विधवा/ लागू नाही

क) विवाहित असल्यास मुला-मुलीची संख्या

| | | |
|---|---|---|
| २५(अ) | फौजदारी प्रकरण पोलीस/ न्यायालयात दाखल किंवा प्रलंबित आहे काय ? | होय/नाही |
| २५(ब) | दिवाणी प्रकरण न्यायालयात/प्राधिकरणात प्रलंबित आहे काय ? | होय/नाही |
| २६. | अर्जादाराकडे खालील कागदपत्रे आहेत काय ? | होय/नाही |
| १ | शालांत परीक्षा प्रमाणपत्र (जन्मतारखेच्यादाखल्यासाठी) आहे काय ? | होय/नाही |
| २ | एस.एस.सी/ एच.एस.सी/पदविधर/पदयुत्तर गुणपत्रक आहे काय ? | होय/नाही |
| ३ | जातीचे प्रमाणपत्र आहे काय ? | होय/नाही |
| ४ | जात वैधता प्रमाणपत्र आहे काय ? | होय/नाही |
| ५ | उन्नत व प्रगत गटात नसल्याचे (नॉन क्रिमीलेअर) निकटतम वर्षाचे | होय/नाही |
| | कालावधीचे प्रमाणपत्र आहे काय ? | होय/नाही |

## उमेदवाराचे स्वाक्षरीत करावयाचे प्रतिज्ञापत्र

प्रमाणित करतो/करते की वर नमूद केलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे सत्य आणि बरोबर आहे. नमूद केलेल्या पदासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता माझ्याकडे आहे याची खात्री करुनच हा अर्ज मी सादर करीत आहे.

मी आणखी असेही प्रमाणित करतो/करते की अर्जात दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळल्यास या माहितीच्या आधारे मिळालेली नोकरी गमावण्यास मी बाध्य राहील व त्याबद्यल माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

**अर्जदाराची सही**

दिनांक :

**नांवः-**

ठिकाण

# <u>लहान कुटूंबासंबंधी प्रतिज्ञापत्र</u>

**नमूना - अ**

**(नियम - ४)**

मी श्री / श्रीमती / कुमारी -------------------------------------------------------श्री --- --------------------- यांचा /यांची मुलगा / मुलगी / पत्नी, वय --------- वर्ष -------राहणार ----- ------------------------- याद्वारे पुढील प्रमाणे असे जाहीर करतो / करते की,

१) मी -------------------------- या पदासाठी माझा अर्ज दाखल केला आहे.

२) आज रोजी मला ---------------- (संख्या) इतकी हयात मुले आहेत त्यापैकी दिनांक २८-३-२००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ------आहे (असल्यास जन्म दिनांक नमूद करावा)

३) हयात असलेल्या मुलांची संख्या २ पेक्षा अधिक असतील तर दिनांक २८-३-२००५ वा तदनंतर जन्माला आलेल्या मुलामुळे या पदासाठी मी अपात्र ठरविण्यास पात्र होईल, याची मला जाणीव आहे.

दिनांक :-

**अर्जदाराची स्वाक्षरी**

स्थळ :-

**नांव:-**

## <u>ओळखपत्र (दोन प्रतीत)</u>

अर्जावर
चिकटवलेले
छायाचित्र
___________

१. उमेदवार क्रमांक -----------

२. उमेदवाराचे संपूर्ण नांव -------------------------------

३. ज्या पदाकरिता अर्ज केला असेल
त्या पदाचे नांव -----------------